निविदा विभाग
पुणे महानगरपालिका
जावक क्र-. ८
दिनांक-: १७/६/२०२०

## कार्यालयीन परिपत्रक

विषय -: महाटेंडर पोर्टलद्वारे Award of Contract ची कार्यवाही सत्वर करून यशस्वी ठेकेदाराचे बयाणा रक्कम जमा करून उर्वरित सर्व ठेकेदाराचे बयाणा रक्कम परत करणे बाबत .

महाटेंडर पोर्टलद्वारे ऑनलाईन निविदा कार्यप्रणाली पुणे महानगरपालिकेमध्ये सुरु करण्यात आली असून महानगरपालिकेचे सर्व कार्यालये महाटेंडर पोर्टलद्वारे निविदा राबवित आहेत.

ठेकेदाराकडून निविदा भरताना निविदा शुल्क आणि बयाणा रक्कम ऑनलाईन जमा करून घेण्यात येते. निविदा आमंत्रित करणा-या खात्याने महाटेंडर पोर्टलवरून निविदांचा तांत्रिक लिफाफा (technical envelope )आणि व्यापारी लिफाफा (commercial envelope) उघडल्यावर Award of contract ची कार्यवाही केल्यावर यशस्वी ठेकेदाराचे बयाणा रक्कम जमा करून उर्वरित सर्व ठेकेदाराचे बयाणा रक्कम परत केली जाते.

आमचे असे निदर्शनास आले आहे की व्यापारी लिफाफा (commercial envelope) उघडल्यावर देखील Award of contract ची कार्यवाही निविदा आमंत्रित करणा-या खात्याकडून केली जात नाही आणि निविदा तश्याच प्रलंबित ठेवल्या जातात.सदर बाब योग्य नसून संभ्रम निर्माण करणारी आहे.अयशस्वी ठेकेदारास बयाणा रक्कम परत मिळत नसल्यामुळे त्यांचेकडून वारंवार विचारणा होत आहे.

निविदांचे व्यापारी लिफाफा (Commercial envelope) उघडल्यावर निविदा आमंत्रित करणा-या खात्याने Award of Contract ची कार्यवाही करावी .Award of Contract ची कार्यवाही पोर्टलद्वारे केल्याशिवाय यशस्वी ठेकेदाराचे बयाणा रक्कम जमा होऊन उर्वरित सर्व ठेकेदाराचे बयाणा रक्कम परत केली जात नाही याची नोंद घ्यावी. ठेकेदारांचे ऑनलाईन बयाणा रक्कम जमा करणे,परत करणेची सर्वस्वी जबाबदारी संबधीत

निविदा क्लार्क यांची आहे.याबाबतची खातरजमा संबंधीत मा.खातेप्रमुख यांनी करावी.सर्व मा.खातेप्रमुखांनी त्यांचे अधिनस्त सर्व निविदा कर्मचारी यांना सूचना द्याव्यात.

तरी महाटेंडर पोर्टलद्वारे व्यापारी लिफाफा (Commercial envelope) उघडल्यावर Award of Contract ची कार्यवाही सत्वर करून यशस्वी ठेकेदाराचे बयाणा रक्कम जमा करून उर्वरित सर्व ठेकेदाराचे बयाणा रक्कम परत करणेस विनंती आहे.

मा.स.कळावे

राहुल जगताप
निविदा विभाग प्रमुख तथा
ई -प्रशासक माहिती व तंत्रज्ञान विभाग
पुणे महानगरपालिका

प्रत -:

१)मा.महापालिका आयुक्त
पुणे महानगरपालिका

२)मा.अतिरिक्त महापालिका आयुक्त (वि./ज./इ.)
पुणे महानगरपालिका

यांजकडे माहिती करिता सविनय सादर

३)सर्व मा.खातेप्रमुख
पुणे महानगरपालिका

यांजकडे माहिती व पुढील कार्यवाहीसाठी